# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २९ जुलै, २०१५ / श्रावण ७, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

### नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील जलस्वराज्य प्रकल्पाच्या लेखा परिक्षणाबाबत

**(१) * २६७४६ श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : तारांकित प्रश्न क्रमांक १५१८९ ला दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी स्थानिक निधी परिक्षणासाठी जलस्वराज्य प्रकल्पाची आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास अध्यक्ष, सचिव, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता

समिती, नांदरुख आणि अन्य व्यक्तींविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्याचे शासनाने दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी आदेश देऊनही अद्‍याप पालन न झाल्याची गंभीर बाब माहे जून २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू प्रकरणी शासन आदेशाचे पालन करण्यात दिरंगाई करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्थानिक लेखा निधी, सिंधुदुर्ग यांच्यामार्फत किती कालावधीत लेखा परिक्षण पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) संबंधितांविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्याचे आदेश दि. २६/०३/२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आले होते, हे खरे आहे.

तथापि, या प्रकरणी केलेल्या चौकशी अंती असे आढळून आले की, ग्रामपंचायत नांदरुख यांनी लेखा परिक्षणासाठी आवश्यक ती कागदपत्रे ग्रामीण पाणी पुरवठा विभागास दि. ०७/०२/२०१३ रोजी सादर केली होती. तथापि, त्यावेळी पुरेसे अभिलेख पडताळणीस उपलब्ध न झाल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना परिपूर्ण तपासणी करता आली नाही. तदनंतर जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि. २६/०५/२०१४ च्या पत्रान्वये लेखा परिक्षणासाठी सहाय्यक संचालक, स्थानिक लेखा निधी, सिंधुदुर्ग यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला, तथापि सदर प्रस्ताव विहित नमुन्यात संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्याबाबत सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दि. २९/०५/२०१४ च्या पत्रान्वये सूचीत केले. त्यानुसार ग्रामपंचायत, नांदरुख यांनी विहित नमुन्यातील जोडपत्र दि. २१/०५/२०१५ रोजी सादर केल्याने त्यानुसार विशेष लेखा परिक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दि. ०७/०७/२०१५ च्या पत्रान्वये संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे सादर केला आहे.

वरील प्रमाणे ग्रामपंचायत, नांदरुख यांनी जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत घेण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेची आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन दिली असल्याने अध्यक्ष/ सचिव, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, नांदरुख आणि अन्य व्यक्तींविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला नाही.

(४) व (५) सदर पाणी पुरवठा योजनेचे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रस्तावाची त्यांच्याकडून सविस्तर छाननी होणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर योजनेचे लेखा परिक्षण करण्यासाठी निश्चित काही कालावधी लागेल.

-----------------

**अस्तगांव (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील**
**ग्रामीण नळपाणी पुरवठा बंद असल्याबाबत**

**(२) * २४७८९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अस्तगांव (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील रुपये २ कोटी खर्चाची ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना गत ११ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेवरील खर्च कागदोपत्री दाखवून ठेकेदाराला त्याची सर्व रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व उक्त गावाला पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

अस्तगांव (ता.राहता, जि.अहमदनगर) योजनेची कामे म.जी.प्रा. मार्फत सन १९९७-२००१ काळात पूर्ण करण्यात आली. योजना यशस्वीरित्या कार्यान्वित झाल्यानंतर योजना माहे एप्रिल २००१ ते माहे डिसेंबर, २००१ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात आली आहे. सदर योजना ग्रामपंचायत अस्तगांव, ता. राहता यांना दि.०८.०४.२००४ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. योजनेची देखभाल दुरुस्ती ग्रामपंचायत अस्तगांव यांच्याकडे असून सद्यस्थितीत योजना ग्रामपंचायतीने विद्युत बिल न भरल्यामुळे म.रा.वि. कंपनीने वीज पुरवठा खंडीत केल्याने व देखभाल दुरुस्ती अभावी अंशत: बंद आहे. तथापि योजनेच्या साठवण तलावात कॅनॉल रोटेशनचे पाणी भरुन योजनेतील जलशुध्दीकरण केंद्र वगळता कार्यान्वित इतर उपांगाचा वापर करुन साठवण तलावाजवळील पाझर विहिरीतून गावात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

मंजूर योजनेची कामे पूर्ण झाल्याने आणि योजना हस्तातंरीत झालेली असल्याने शासनाच्या योजना लेखे बंद करण्याचे आदेशाप्रमाणे अंतिम देयक तयार करण्यात आले आहे.

(३) वरील प्रमाणे शासनाने निर्देशीत कामकाज पूर्ण केलेले असल्याने कोणत्याही प्रकारची चौकशी वा कार्यवाही करण्याचा प्रश्न नाही.

राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये नव्याने अस्तगांव वाडयाकरीता योजना जि.प. अहमदनगर मार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) कोणताही विलंब झालेला नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने**
**सादील अनुदान वितरीत केले नसल्याबाबत**

**(३) * २५३२१ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने मागील ५ वर्षापासून ४ टक्के सादिल अनुदान वितरीत केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदानाअभावी शाळांना आर्थिक अडचण निर्माण होत असून वीज देयकांचा भरणासुध्दा करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान वितरीत न करण्याची कारणे काय तसेच सदरील अनुदान संबंधित शाळांना त्वरीत वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: उक्त अनुदान केंव्हापर्यंत संबंधित शाळांना प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासंदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान निर्धारण झाल्याशिवाय पुढील अनुदान उपलब्ध करुन देण्यात येऊ नये अशा सूचना दिनांक ९ जुलै, २००९ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच, शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक १७ एप्रिल, २०१५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने वितरीत करण्यापुर्वी सदर संस्थाकडून राज्य शासनास येणे असणारी रक्कम वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे असे आदेश आहेत. बुलढाणा

जिल्हा परिषदेचे सन २०११-१२ अखेर अनुदान निर्धारण पूर्ण झालेले असून रुपये ३७,६३,८१,७४६/- इतकी अखर्चित वसुलपात्र रक्कम शासनाकडे येणे बाकी आहे. सदर रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर बुलढाणा जिल्हा परिषदेस ४ टक्के सादील अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये**
**"ब्लड कॉम्पोनेंट सेप्रेटर" मशीन व पॅथॉलॉजी विभागात**
**अत्याधुनिक यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्याबाबत**

**(४) * २२१०७ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रक्तघटक वेगळे करणारे "ब्लड कॉम्पोनेंट सेप्रेटर" मशीन उपलब्ध नसल्यामुळे तसेच पॅथॉलॉजी विभागात अत्याधुनिक यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्यामुळे उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांना ७०० ते ८०० रुपयात रक्ताच्या विविध तपासण्या कराव्या लागतात, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त रुग्णालयात बेडशीटच्या कमतरतेमुळे रुग्णांना रक्ताने माखलेल्या जुन्याच बेडशीटचा वापर करावा लागत असल्याने रुग्णांना संसर्गजन्य आजाराचा धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रक्तघटक वेगळे करणारे "ब्लड कॉम्पोनेंट सेप्रेटर" मशीन उपलब्ध नाही. तथापि संस्थेमध्ये रक्तासंबंधीच्या सर्व प्रकारच्या चाचण्यासाठी आवश्यक सर्व यंत्रे उपलब्ध असल्याने सर्व प्रकारच्या रक्तचाचण्या संस्थेमध्येच होतात.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे (ता.खेड) येथील औद्योगिक वसाहतीतून तसेच नांदिवडे जयगड परिसरातील औद्योगिकीकरणामुळे होणारे प्रदूषण**

**(५) * १८४१९ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील लिटमस ऑर्गेनिक प्रा.लि. या रासायनिक कंपनीतून दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या वायुगळतीमुळे कंपनीलगत असलेल्या मैदानात क्रिकेट खेळणा-या ९ स्थानिक तरुणांना बाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त औद्योगिक वसाहतीतील रसायनमिश्रित सांडपाणी जगबुडी नदीत सोडण्यात आल्याने नदीतील हजारो मासे मृत झाल्याची घटना दिनांक २२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे व नदी, खाडीकिनारी शेती व भाजीपाला करणा-या शेतक-यांच्या पिकांवरही रसायनमिश्रित पाण्याचा परिणाम झाला आहे तसेच शेतक-यांच्या पायांना व्याधी जडू लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नांदिवडे जयगड (जि.रत्नागिरी) परिसरातील औद्योगिकीकरणामुळे विहिरींचे पाणी प्रदूषित होत असल्याने सदर प्रदूषित पाण्यामुळे परिसरातील आंबा, काजू, नारळ बागा यांचे नुकसान होत असून बागा करपून जात आहेत तसेच कहटिश्वर मंदिरालगत असलेल्या नैसर्गिक जलस्त्रोतांवरदेखील त्याचा दुष्परिणाम होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनांबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबधितांवर तसेच कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५ मे, २०१५ रोजी सदर कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेदरम्यान कापडी बॅग फाटल्यामुळे ॲक्मे हे पावडर स्वरुपातील उत्पादन वातावरणात पसरले. सदर घटनेमुळे कंपनीलगत असलेल्या मैदानात क्रिकेट खेळणाऱ्या ४ स्थानिक तरुणांना बाधा झाली.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्नभाग १ मध्ये नमुद घटनेसंदर्भात मे. लिटमस ऑर्गेनिक प्रा. लि. कंपनीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत अंतरिम निर्देश बजावण्यांत आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खडका (ता.महागाव,जि.यवतमाळ) येथे ग्रामपंचायतीमध्ये शासनाच्या विविध योजनेच्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(६) * २४६०० श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडका (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीमध्ये ग्राम विकासाकरीता निर्मल भारत अभियान, महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी योजनेतून शौचालयाकरीता आलेल्या निधीत व पाणीपुरवठा योजनेतील लोकवर्गणी इत्यादी कामात गैरप्रकार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडका ग्रा.पं.चे. तत्कालीन सचिव व्ही.ए. बेदरकर यांनी शासनाच्या विविध योजनेच्या निधीत प्रचंड अफरातफर करून गैरव्यवहार केला असल्याचे गट विकास अधिकारी यांच्या चौकशी अहवालात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय,

सदर अनियमिततेप्रकरणी केलेल्या चौकशीच्या अहवालानुसार खडका ग्रामपंचायतीचे तत्कालीन सचिव श्री.व्ही.ए.बेदरकर यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या दि.१८/०५/२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

तसेच संबंधित सरपंच यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

त्याचबरोबर अपहारीत रक्कमेची वसूली करण्याची कार्यवाही देखील सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील विविध शासकीय गोदामातील धान्याचा होत असलेला अपहार

**(७) * २७१२८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील विविध शासकीय गोदामातील धान्याची अपहार प्रकरणे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मोठ्या प्रमाणात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अकोला (जि.अकोला) तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागामध्ये दरमहा ४ हजार लीटर रॉकेलचा काळाबाजार होत असल्याचे व मंजूर नियतनानुसार वाटप करणे आवश्यक असताना काही रास्तभाव दुकानदारांना कमी व काहींना जास्त वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे करूनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील अकोट तालुक्याच्या शासकीय गोदामातील धान्य अपहार प्रकरणी गोदामपाल योगेश जांभोरकर यांचेकडून अपहारीत धान्याची रक्कम वसूल करण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी नोटीस बजावली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर जिल्ह्यात शासकीय धान्याच्या अपहाराची किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत,

(५) असल्यास, दोषी आढळलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अकोट जि.अकोला येथील शासकीय धान्य गोदामामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दि. १४.०५.२०१५ रोजी केलेल्या तपासणीत गहू १७३.९२ क्विं. व तांदुळ ३०.६१ क्विं. कमी आढळून आला आहे.

(२) माहे एप्रिल, २०१५ मध्ये अकोला तालुक्यातील परवानाधारकांना केरोसिनचे कमी/जास्त वाटप झाल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात चौकशी करण्यात आली असून चौकशी पथकाचा अहवाल दि. ८ जुलै, २०१५ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांना सादर करण्यात आला. या प्रकरणी संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अकोट जि.अकोला येथील गोदामाच्या तपासणीत गहू १७३.९२ क्विं. व तांदुळ ३०.६१ क्विं. कमी आढळून आला आहे. या प्रकरणी कमी आढळून आलेल्या धान्यापोटी श्री.योगेश जांभोरकर, गोदामपाल यांचेकडून वसुलीकरीता दि. १० जुलै, २०१५ रोजी आदेशित केले आहे. तसेच त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित आहे.

यावव्यतिरिक्त वाहतुक कंत्राटदार मे.श्याम गुडस् गॅरेज, अकोला यांनी वाशिम येथून उचल केलेल्या धान्याचा ट्रक चोरीस गेल्याचे प्रकरण माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये आढळून आले. याप्रकरणी अतिरिक्त वाहतुक कंत्राटदार, अकोला यांचेकडून रु.५,९६,१२१/- इतका दंड वसुल करण्याचे आदेशित केले आहे. त्यांचे कंत्राट दि. ५ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आले आहे. व या प्रकरणी सिटी कोतवाली अकोला पोलीस स्टेशन येथे दि.१० फेब्रुवारी, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन येथे वर्ग केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडोद खुर्द व निरगुडी (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील पाणी पुरवठा योजनेत झालेला अपहार

**(८) * २५८२४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडोद खुर्द (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील पाणीपुरवठा योजनेत ४ लाख रुपयांचा अपहार होऊन अनेक महिने झाले तरी जिल्हा परिषद प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे तसेच निरगुडी पाणी पुरवठा योजनेचे १९ लाख रुपये समितीच्या अध्यक्षाने परस्पर काढून घेतले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

(अ) वडोद (खु.) माटरगांव योजनेत समितीकडून रु.४.७६ लक्ष जास्त उचल करण्यात आली आहे.

(ब) निरगुडी (बु.) व निरगुडी (खु.) ता. खुलताबाद या दोन्ही गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष यांनी दि.२७.५.२०१५ रोजी खात्यातून रु.१९ लाख परस्पर रक्कम उचल केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) (अ) पाणी पुरवठा व स्वच्छता समिती वडोद, ता. खुलताबाद यांना नोटीस देवून अतिरिक्त उचल केलेल्या किंमतीचे काम पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार दि.१७.५.२०१५ पासून समितीने कामास सुरुवात केली आहे.

(ब) निरगुडी (बु.) व निरगुडी (खु.) या दोन्ही गावाच्या पाणीपुरवठा अध्यक्षास परस्पर उचल केलेली रक्कम भरणा करण्यास कळविण्यात आले असून रु.१९.०० लक्ष पैकी रु.७.५० लक्ष रक्कम समितीने अध्यक्षाने खात्यावर भरणा केली आहे. उर्वरित रु. ११.५० लक्ष भरण्यास दि.५.८.२०१५ पर्यंत मुदत मागितलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कायगांव-पैठण-शहागड मार्गे नांदेडपर्यंत असलेल्या गोदावरीच्या पात्रात जलप्रदूषणाची समस्या निर्माण झाल्याबाबत**

**(९) * २६८८१ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायगांव-पैठण-शहागडमार्गे नांदेडपर्यंत असलेल्या गोदावरीच्या पात्रात सांडपाणी, धार्मिक विधीचा कचरा, प्लास्टिक पिशव्या टाकल्या जात असल्याने जलप्रदूषणाची समस्या निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीस नांदेड शहरातील १८ नाले येऊन मिळतात, त्यामुळे स्वच्छतेच्या उपाययोजना न केल्याने गोदावरी नदीतील प्रदुषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास, मासे तसेच इतर जलचर प्राणी व वनस्पतींना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड शहरातील गोदावरी नदीत होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही. तथापि नांदेड शहरानजीक गोदावरी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी खालील उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

(अ) बोंडार येथे ८७ एमएलडी क्षमतेचा मलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत केला आहे.

(ब) दक्षिण नांदेड मध्ये ३० एमएलडी क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्राचे कार्यान्वीत झाले आहे.

(क) उत्तर नांदेड मधील भागासाठी म्हणजेच तरोडा व सांगवी भागासाठी १५ एमएलडी क्षमतेचा मलशुध्दीकरण केंद्राचे काम प्रगती पथावर आहे.

(ड) १८ नाल्याचे पाणी वळवून एकत्रीत करुन २६ एमएलडीच्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुसावळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची आवर्ती ठेव (R.D) रक्कम त्यांच्या खात्यात जमा न झाल्याबाबत

**(१०) * २७४१३ श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांतील २३ शिक्षकांच्या पगारातून कपात करण्यात आलेली आवर्ती ठेव (R.D) रक्कम त्यांच्या खात्यात गत ५ वर्षात जमा न झाल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेने गटविकास अधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील आवर्ती ठेवीची रक्कम संबंधित शिक्षकांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेने गटविकास अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात तक्रार केली आहे. परंतू, गत पाच वर्षात शिक्षकांच्या पगारातून कपात करण्यात आलेली आवर्ती ठेव रक्कम, धनादेशाद्वारे नियमित वेतन झाल्यानंतर आवर्ती ठेव खात्यांमध्ये जमा करण्यात आली आहे.

(२) व (३) प्राप्त माहितीवरुन असे दिसून येते की, कपात केलेली रक्कम थोडी विलंबाने R.D. खात्यावर जमा केली आहे.

-----------------

**बुलढाणा जिल्ह्यातील तालुका क्रीडा संकुलाचे**
**बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(११) * २२९६१ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील एमटीडीसीच्या मागील मैदानावरील ५-६ वर्षापूर्वी लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सद्य:स्थितीत सदरील क्रीडा संकुलात विद्युत जोडणी नाही, खेळांडुसाठी क्रीडा साहित्याचा, पेयजलाचा तसेच इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील क्रीडा संकुलनात स्थानिक पंचायत समितीच्या वर्षातून १-२ क्रीडा स्पर्धा वगळता येथे कोणतीही स्पर्धा घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली तसेच सदरील क्रीडा संकुलनास सर्व सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. सदर संकुलाच्या देखरेख व नियंत्रणाकरीता तालुका क्रीडा संकुल समितीव्दारे वास्तुशिल्प तज्ञांची नियुक्ती करण्यात आली असून त्याच्या नियंत्रणाखाली सदरचे बांधकाम पूर्ण होत असल्याने ते निकृष्ट दर्जाचे झालेले नाही. तसेच सदर क्रीडा संकुलातील विद्युत प्रवाह जोडणीकाम अंतिम टप्यात

आहे. त्याचप्रमाणे या क्रीडा संकुलाच्या दुस-या टप्प्यातील बांधकामामध्ये अन्य आवश्यक क्रीडा विषयक सुविधा हाती घेण्यात आल्या आहेत,

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालाड (मुंबई) येथील पठाणवाडी झोपडपट्टीत दूध भेसळ करणाऱ्या टोळीला केलेली अटक**

**(१२) * २५५८७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) येथील पठाणवाडी झोपडपट्टीत नामांकित दूध पिशव्यांचे टॅपरिंग करुन भेसळ करताना दिनांक २६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी एका टोळीला अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे, सदर टोळीकडून किती किंमतीचा दुधसाठा जप्त करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर धाड ही दिनांक २७/०५/२०१५ रोजी टाकण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी एका व्यक्तीस अटक करण्यात आली होती. सदर व्यक्तीकडून दूधाचे दोन नमुने तपासणीसाठी घेतले असून, त्याच्याकडे आढळून आलेला दुधाचा १९७ लिटर साठा किंमत रु.७४८६/- जप्त करण्यात आला असून, कायद्यातील तरतूदीनुसार संबंधित व्यक्तीविरुध्द कुरार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला आहे.

(३) सदर व्यक्ती दुधात पाणी मिसळून दुधाच्या पिशव्या पुनर्बंद करीत असताना रंगेहाथ पकडल्याने सदर व्यक्तीविरुध्द न्यायालयीन कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१३) * २५९६१ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) या तालुक्यातील जवळपास ३८ ते ४० गांवे पूर्णपणे तीव्र पाणी टंचाईत असतानाही मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सन २०१४ मध्ये सोलापूर जिल्ह्यासाठी सुरु करण्यात आलेल्या पाण्याच्या टँकरची संख्या २७५ वरुन फक्त आठ करण्यात आल्यामुळे पाण्याची अधिकच टंचाई निर्माण झाली असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना पाण्याचे टँकर कमी करण्यात येण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषी आढळून येणा-यांवर कोणती कारवाई केली व सदर तालुक्याला पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

पंढरपूर तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतींकडून तहसिल, पंचायत समिती वा जिल्ह्याधिकारी कार्यालय सोलापूर यांचेकडे पाण्याचा टँकर मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाला नाही. त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील गावांसाठी टँकर लावण्यात आले नाही.

माहे जुलै, २०१४ मध्ये सोलापूर जिल्ह्यात २१२ टँकर सुरु होते. परंतु सद्यःस्थितीत सोलापूर जिल्ह्यात माढा, माळशिरस आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात मागणीनुसार ८ टँकरव्दारा पाणीपुरवठा सुरु आहे.

तसेच, आवश्यकतेनुसार पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय/निमशासकीय शिक्षक महिला कर्मचा-यांना केंद्र शासनाप्रमाणे दोन वर्षाची बालसंगोपनाची रजा मिळण्याबाबत**

**(१४) * १७९२४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/निमशासकीय शिक्षक महिला कर्मचा-यांना केंद्र शासनाप्रमाणे दोन वर्षाची बालसंगोपनाची रजा मिळावी याकरीता लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ मे, २०१५ रोजी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्नी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यातील शासकीय/निमशासकीय शिक्षक महिला कर्मचा-यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) राज्यशासनाच्या कोणत्याही संवर्गातील महिला शासकीय कर्मचा-यांना केंद्र शासनाप्रमाणे दोन वर्षाची बालसंगोपनाची रजा अनुज्ञेय करण्यात आलेली नाही. त्याबाबतीत धोरणात्मक निर्णय अद्याप घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावरोली (ता.खालापूर, जि.रायगड) येथील गोदामावर धाड टाकून रेशनवरील गहू व तांदूळ जप्त करण्यात आल्याबाबत**

**(१५) * २०९९८ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरोली (ता.खालापूर,जि.रायगड) येथे एका गोदामावर धाड टाकून कोटयवधी रुपयांचा रेशनवरील गहू व तांदूळ जप्त करण्यात आल्याची घटना माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय.

तहसील, कार्यालय खालापूर यांच्या पथकाने जय फुड मिलच्या मौ.सावरोली, ता. खालापूर येथील गोदामावर टाकलेल्या धाडीत १०,७२६.५० क्विंटल तांदूळ व ८१ क्विंटल गहू आढळून आला आहे. धाडीत आढळून आलेला तांदुळ व गहू हा सार्वजनिक वितरण व्यवस्थेची संबंधीत नसल्याने सदरचा धान्यसाठा जप्त करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्‍यापीठाने युनानी, आयुर्वेद, आणि होमिओपॅथी डॉक्टरांसाठी फार्माकॉलॉजीचा अभ्यासक्रम तयार केल्याबाबत**

**(१६) * २१७१६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्‍यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्‍यापीठाने राज्यातील युनानी, आयुर्वेद आणि होमिओपॅथीच्या प्रॅक्टीस करणा-या डॉक्टरांसाठी एक वर्षाचा फार्माकॉलॉजीचा अभ्यासक्रम तयार केला असुन सदरील अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. केवळ होमिओपॅथीची डॉक्टरांसाठी एक वर्षाचा 'फार्माकॉलॉजीचा' अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्‍यापीठामार्फत सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## वसई, नालासोपारा (जि.पालघर) परिसरात पिण्याच्या पाण्याचा अप्रमाणित व्यवसाय करणा-या कंपन्यांवर केलेल्या कारवाईबाबत

**(१७) * २७१५१ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, नालासोपारा (जि.पालघर) परिसरात पिण्याच्या पाण्याचा बनावट (मिनरल वॉटरचा) व्यवसाय करणाऱ्या कंपन्या मोठ्या प्रमाणात सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी बनावट मिनरल वॉटरचा व्यवसाय करणाऱ्या ३४ कंपन्यांवर दिनांक १६ ते १८ मे, २०१५ या कालावधी दरम्यान कारवाई करुनही सदर गैर उद्योग अजुनही सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर व कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

तथापि,सदर परिसरात पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे विना परवाना तसेच विना बी.आय.एस. प्रमाणपत्र उत्पादन करणाऱ्या आस्थापना आढळून आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

तथापि, यापूर्वी विना परवाना तसेच विना बी.आय.एस प्रमाणपत्राशिवाय पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे उत्पादन करणाऱ्या एकूण ११ आस्थापनांविरुध्द एफआयआर दाखल करुन कलम ३६(३)(बी) अंतर्गत प्रतिबंधित आदेश देण्यात आले आहेत. तसेच १४ आस्थापनांची तपासणी करुन अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ च्या कलम ३६(३)(बी) अंतर्गत प्रतिबंधित आदेश देण्यात आले आहेत. वरील ११ पैकी एकूण ०९ आस्थापनांकडून चाचणीसाठी घेतलेले अन्न नमुने हे अन्न विश्लेषक यांनी असुरक्षित घोषित केल्यामुळे सदर ०९ आस्थापनांविरुध्द मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच यापूर्वी विना बी.आय.एस. परवाना व्यवसाय करणाऱ्या ०८ अन्न आस्थापनांचा शोध घेऊन त्यांचे विरुध्द मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुका व नरसी शहरातील पाणी पुरवठ्याबाबत**

**(१८) * १७१७४ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात भूजल सर्वेक्षण विभागाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये विहिरींची जलपातळीची पडताळणी केली असता भूजलपातळी सरासरी ५.५ मीटर असणे आवश्यक असताना ती ६.३५ मीटरपर्यंत खोल गेली असल्याने येथील नागरीकांना तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामीण राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत नरसी (जि.नांदेड) शहरासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येऊनही पाच वर्षाचा कालावधी झाला तरी ही योजना पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी दरवर्षी होणाऱ्या पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे. किनवट तालुक्याची भुजल पातळीची सरासरी ५.०५ मीटर आहे. माहे जानेवारी, २०१५ मध्ये किनवट तालुक्यामध्ये १७ निरिक्षण विहीरीचे भुजल पातळीची नोंद घेण्यात आली. त्यावरुन तालुक्याची ६.३५ मीटर भुजल पातळी असल्याची नोंद करण्यात आली.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सद्यस्थितीत मंजूर योजनेच्या सर्व उपांगाची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत. योजनेत जलशुध्दीकरण केंद्र व वितरण व्यवस्थेचे काम समाविष्ट नाही. सदरील कामे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखड्यात नव्याने समाविष्ट करुन हाती घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासोदा (ता. एरंडोल, जि.जळगाव) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु झाले नसल्याबाबत

**(१९) * २४०३३ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासोदा (ता. एरंडोल, जि.जळगाव) या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी शासनाने खास बाब म्हणून रुपये ७१ लाखांची तात्पुरती पाणीपुरवठा योजना मंजूर करुन सुरु केली तरीही सदर गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५००० लोकसंख्या असलेल्या गावामध्ये सदर योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे गाव पाण्यापासून वंचित आहे तसेच सदर गावासाठी रुपये १५ कोटीच्या नवीन कायमस्वरुपी योजनेचे काम मंजूर होवूनही अद्यापही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्न भाग (१) व (२) बाबतच्या योजनांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच पाणी पुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजना ही पाणी टंचाई कार्यक्रमांतील तात्पूरती योजना असल्यामुळे योजनेची सर्व कामे संबंधित ग्रामपंचायतीने त्वरीत हस्तांतर करुन घेणे क्रमप्राप्त होते. परंतु संबंधित ग्रामपंचायतीने योजना हस्तांतरीत करुन देखभाल दुरुस्ती करण्यास नकार दिला. त्यामुळे गावास पाणी पुरवठा होऊ शकलेला नाही.

तथापि मौ. कासोदा गावासाठी एक स्वतंत्र जुनी योजना कार्यान्वित आहे. तसेच कासोदा गावास आडगांव व १६ गावे पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) कासोदा तात्पुरत्या पाणी पुरवठा योजेनेचे काम समाधानकारक झालेले आहे.

तथापि कासोदा गावापुरती पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीने नियमित सुरु ठेवल्यास कासोदा गावास सुरळीत पाणी पुरवठा होऊ शकेल व कासोदा गाव पाण्यापासून वंचित राहणार नाही.

(३) सदरील कासोदा तात्पुरती पाणी पुरवठा योजनेच्या कामाची चौकशी दिनांक २८.०५.२०१५ पर्यंत करण्यात आलेली आहे. चौकशीत कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळलेली नसल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर योजनेच्या रु.१२.९० कोटी (रु.१२ कोटी नव्वद लाख) किंमतीच्या रकमेस शासन स्तरावरुन दि.२८ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निविदा प्रपत्रे तपासण्याचे काम मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.कवडा (जि.जालना) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(२०) * २६८४८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कवडा (जि.जालना) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यक्रमातंर्गत संबंधित योजनेचा प्रथम हप्ता रूपये १३,०८,३४८/- इतका निधी वितरित करुन सदरील रक्कमेचे मुल्यांकन संबंधित कार्यालयामध्ये सादर करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खर नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लासलगांव (जि.नाशिक) येथील विंचुरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत**

**(२१) * १८२६३ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव (जि.नाशिक) येथील विंचुरसह १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी करुनही सदर प्रश्न प्रलंबित असल्याने ऐन उन्हाळ्यात पाण्याचा अपव्यय होवून या १६ गावांसमोर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाशिक जिल्ह्यातील लासलगांव विंचूरसह १६ गावाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे हे खरे आहे. सदर योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली असून योजनेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती ही संयुक्त ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे. सदर योजनेचे संकल्पित वर्ष २०३१ असून योजनेद्वारे किरकोळ दुरुस्ती वगळता पाणीपुरवठा सुरळीत सुरु असून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी करण्यात आलेली नाही.
(२) लासलगांव विंचूरसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची कामे ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली असून दि. ०८/०२/२०१२ पासून योजनेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती ही अध्यक्ष संयुक्त पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे. मूळ योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले असल्याने योजनेतील पाईपलाईनचे सक्षमीकरण करण्याविषयी योग्य त्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेरवाडी (मुंबई) येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्राध्यापक व चतुर्थ श्रेणी कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) * २२२४८ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेरवाडी (मुंबई) येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील २२५ प्राध्यापक व चतुर्थ श्रेणी कामगारांचे दुस-या सत्रातील वेतन गत चार वर्षापासून प्रलंबित असून, जवळपास रुपये २.५ कोटी वेतन थकीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त महाविद्यालयातील प्राध्यापकांचे व कामगारांचे प्रलंबित वेतन त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासकीय तंत्रनिकेतन, खेरवाडी, मुंबई या संस्थेतील व्दितीय पाळीसाठी काम करणाऱ्या कोणत्याही अध्यापक/कर्मचारी यांचे नियमित वेतन प्रलंबित नसून संस्थेतील दुसऱ्या पाळीकरीता त्यांना मोबदला म्हणून अनुज्ञेय असलेले वेतन अदा करण्याचे प्रलंबित आहे.

(२) याकरीता शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील शिधावाटप दुकानदारांनी रोजगार हमी योजनेतील मजुरांना वाटावयाच्या धान्यामध्ये केलेला काळाबाजार**

**(२३) * २२९१९ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात सन २००७ मध्ये वा त्या दरम्यान शिधावाटप दुकानदारांनी रोजगार हमी योजनेतील मजुरांना वाटावयाच्या धान्यामध्ये मोठ्या

प्रमाणात केलेल्या काळाबाजाराची दंडनीय वसुली रक्कम रुपये १ कोटी ३२ लाख ४६ हजार ६१३ असून आजपर्यंत केवळ ३६ लाख ९० हजार ८४४ रुपये वसुल करण्यात आल्याबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ९४ लाख ५५ हजार ७६९ रुपये वसुल करण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागाने काही धडक मोहिम राबविण्याचे ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने वसुली करण्यास दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे. मुरबाड तालुक्यात सन २००१-२००२ ते २००६-२००७ या मुदतीत संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेत ९९ रास्त भाव दुकानदार यांनी अपहार केल्याचे विभागीय आयुक्त यांच्या चौकशी अहवालातून निदर्शनास आले आहे. त्याची रक्कम रु. १,३१,४६,६१३/- इतकी आहे. माहे मे २०१५ अखेर ७७ रास्त भाव दुकानदार यांचेकडून रक्कम रु. ४२,५०,४३८/- वसुल करणेत आली आहे.

(२) रास्त भाव दुकानदारांनी तहसिलदारांनी बजावलेल्या मागणी नोटीसीच्या विरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने रास्त भाव दुकानदारांकडून रक्कम वसुली करण्यास तुर्तास स्थगिती दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित रास्त भाव दुकानदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन उर्वरित रक्कम रु. ८८,९६,१७५/- वसुल करणेबाबत पुढील कार्यवाही तहसिलदार, मुरबाड यांचे स्तरावर चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अन्न व औषध प्रशासनातील गैरकारभार वाढल्याबाबत**

**(२४)** * **२५०९८ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या जीवनावश्यक वस्तूंची तपासणी करण्याकरिता असलेल्या अन्न व औषध प्रशासनामधील जवळपास अर्धा

डझन अधिकारी केवळ सहा महिन्यात लाच प्रकरणात अडकले आहेत तसेच यासंदर्भात तक्रारीबाबत प्रशासनात गोपनीयता न राहिल्याने कुणी सामान्य व्यक्ती तक्रारीकरीता समोर येत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरगांव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील कारखान्याच्या रसायन मिश्रित पाण्यामुळे कृष्णा नदी प्रदूषित झाल्याबाबत**

**(२५) * २४१३४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील कृष्णा नदीच्या पात्रात कारखान्याचे रसायन मिश्रित पाणी मिसळल्याने हजारो मासे मृत्युमुखी पडल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर नदीमध्ये मृत झालेल्या माशांची व परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीमध्ये कोंडून ठेवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत माशांमुळे नदीचे पाणी प्रदुषित होऊन दुर्गंधी पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार प्रदुषण रोखण्याचेदृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेच्या अहवालानुसार मासे मतृक विषारी पदार्थामुळे झालेली नाही. तथापि मंडळाद्वारे घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन करणा-या उद्योगांवर वेळोवळी कारवाई केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहाडी, भंडारा व तुमसर (जि. भंडारा) तालुक्यातील आधारभूत धान खरेदी केंद्रावर झालेला गैरव्यवहार

**(२६) * १६३४० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : तारांकित प्रश्न क्रमांक १६१९३ ला दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी, भंडारा व तुमसर (जि. भंडारा) तालुक्यातील आधारभूत धान खरेदी केंद्रावर एकाच वेळी अडीच लाख क्विंटल धान खरेदी केल्याचे दाखवून सुमारे १०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी नियुक्त केलेल्या गडचिरोलीचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, भंडा-याचे उपविभागीय अधिकारी व गोंदीयाचे पुरवठा अधिकारी यांच्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सन २०१३-१४ मध्ये मोहाडी, भंडारा व तुमसर या तालुक्यातील आधारभूत किंमत खरेदी केंद्रावर अडीच लाख क्विंटल धानाच्या खरेदीमध्ये अनियमितता झालेली नसून १,३४,७२८.९० क्विंटल धान खरेदीत अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) सदर चौकशीत सन २०१३-१४ मध्ये मोहाडी, भंडारा व तुमसर या तालुक्यातील आधारभूत किंमत खरेदी केंद्रावर व्यापाऱ्यांमार्फत १,३४,७२८.९० क्विंटल धान खरेदी झाल्याचे निदर्शनास आले आहे.चौकशी समितीच्या अहवालान्वये जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी ४ उप अभिकर्ता संस्था व ८ राईस मिलर्स यांना काळया यादीत

टाकले आहे व त्यांच्यावर १,९१,२३,१४०/- रु. वसूली लावण्यात आली असून २९,१५,९४०/- रु.वसूल केले आहे. उर्वरीत रक्कम वसूलीच्या कारवाईबाबत जिल्हा पणन अधिकारी यांच्या कडून पाठपुरावा सुरु आहे.

शासनाद्वारे गठित करण्यात आलेल्या विशेष तपास समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करुन दोषीं व्यक्ती व संस्थांवर विशेष तपास समितीद्वारे कायदेशीर कारवाई करण्याबाबत दि.८.७.२०१५ ला बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत आधारभूत धान खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेची जबाबदारी दि महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनची असल्याने भारतीय दंड संहिता फौजदारी कलम ४६३,४६४,४०५,३४,१२० अ,१२० ब अन्वये सात दिवसांच्या आत फौजदारी कारवाई करण्याचे निदेश विशेष तपास समितीद्वारे व्यवस्थापकीय संचालक, मार्केटिंग फेडरेशन यांना देण्यात आले. तसेच अशी अनियमितता पुन्हा घडणार नाही, याबाबत विशेष तपास समितीकडून शासनास शिफारस करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक व कासोदा (जि.जळगांव) येथे गुटखा**
**जप्त करण्यात आल्याबाबत**

**(२७) * २०८१६ श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न औषधे प्रशासन विभागाने नाशिकमधून नगरमध्ये विक्री करण्यासाठी आलेला सुमारे ३ लाखांचा गुटखा वाहनासह कोतवाली पोलिस झंडीगेट येथे दिनांक १४ एप्रिल,२०१५ रोजी वा त्या सुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) तसेच जळगांव येथील स्थानिक गुन्हे शाखेने रुपये २ लाख ८४ हजार एवढ्या किंमतीचा गुटखा कासोदा येथे जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, किती आरोपींना अटक करण्यात आली व त्यांच्याविरोधात कोणता गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच प्रश्न भाग (२) मधील आरोपींकडून उक्त गुन्ह्याव्यतिरिक्त इतर गुन्ह्यांतील मुद्देमाल हस्तगत केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेसमवेत अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन यांनी दि.३०/०५/२०१५ रोजी केली असून, दोन प्रकरणी एकूण २,३६,४१०/- एवढया किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

(३) उक्त दोन्ही प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, प्रश्न भाग (१) मध्ये ४, प्रश्न भाग (२) मध्ये ०२ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता व अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रश्न भाग (२) मधील आरोपींकडून इतर गुन्हया व्यतिरिक्त इतर गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत केला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात तसेच कुपवाड (जि.सांगली) येथे बनावट शिधापत्रिका तयार करण्यात येत असल्याबाबत

**(२८) * २०१२५ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील तहसिलदार यांनी सहा हजार बनावट शिधापत्रिका तयार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच कुपवाड (जि.सांगली) येथे बनावट रेशन कार्ड बनवून देणारी टोळी काही वर्षापासून कार्यरत असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

i) उक्त प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शासन आदेश दि.१६.४.२०१५ अन्वये श्री. एस.बी. भराडी, जिल्हा पुरवठा

अधिकारी, बुलढाणा व श्री. के. यु.फुके, निरीक्षण अधिकारी, खामगांव यांचे व शासन आदेश दि. ६.६.२०१५ अन्वये श्री.अशोक एन.टेंभरे, तहसिलदार, खामगाव यांचे निलंबन करण्यात आले आहे. व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दि.१५.४.२०१५ रोजीच्या आदेशान्वये श्री.एस.जी. पारखेडकर,लिपिक यांना निलंबीत करण्यात आले आहे.

ii) एमआयडीसी कुपवाड पोलिस स्टेशन ता. मिरज जि. सांगली येथे दि.१५.४.२०१५ व दि. १.५.२०१५ रोजी श्री. सर्जेराव विजय केसरे यांनी केलेल्या तक्रारी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत दि.२.७.२०१५ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानुसार एकूण ९ शिधापत्रिका बाबत दाखल झालेल्या गुन्हयातील ४ आरोपींना अटक करण्यात आली असुन, सध्या सदर आरोपी जामिनावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अनुदानित शाळेतील शिक्षक सेवकांचा बेकायदेशीर पध्दतीने व्यवसाय कर कपात केल्याबाबत**

**(२९) * १६७८३ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानित शाळेतील बहुतांशी शिक्षक सेवक केवळ ६ हजार इतके तुटपुंजे मानधन घेत असूनही या शिक्षक सेवकांचा शिक्षण निरीक्षक कार्यालयाकडून बेकायदेशीर पध्दतीने व्यवसाय कर कपात केला जात असल्याचे माहे मे, २०१५मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरमहा ७ हजार ५०० रुपयापर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कर आकारण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश आहेत त्यांची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, २०१४ पासून राज्यात सुरू झाली आहे तरी सुध्दा शिक्षण विभागाच्या वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून शिक्षण सेवकांच्या मानधनातून १७५ रुपयांची कपात सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांची व्यवसाय कराची रक्कम कपात न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षण निरीक्षक व मुख्याध्यापक यांच्याकडून नजरचुकीने दरमहा रु. ७५००/- पेक्षा कमी वेतन घेणाऱ्या शिक्षण सेवकांची व्यवसायकर कपात करण्यात आली असे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

यासंदर्भात शासन अधिसूचना दिनांक १९.५.२०१५ अनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, शिक्षण यांना शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उरण (जि.रायगड) परिसरातील विविध कंपन्यांमधून होणारे प्रदुषण**

**(३०) * १९७९८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी परिसरात (ता.उरण,जि.रायगड) उभारण्यात आलेल्या विविध कंपन्यांच्या टॅंक फार्ममधून परिसरातील रस्त्यांलगतच्या गटारांमध्ये मोठया प्रमाणावर रसायने वाहून आल्याने व ही रसायने नाल्यातील पाण्याव्दारे वाहत समुद्रात मिसळून परिसरातील किनारा प्रदुषित होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे रासायनिक टॅंक फार्म कोणत्या कंपनीचे आहेत,

(३) तसेच उरण परिसरात असलेल्या रासायनिक कंपन्यांमधून ज्वलनशील रसायन सोडले जात असल्यामुळे सदर तालुक्यामध्ये प्रदुषण वाढले असल्याबाबतच्या तक्रारी मा. पर्यावरण मंत्री व पर्यावरण विभागाकडे वारंवार करूनही कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कंपन्यांवर व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग व खालापूर (जि.रायगड) येथील जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण केंद्राना जागा उपलब्धतेबाबत**

**(३१) * २३६२४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व खालापूर (जि. रायगड) येथील जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रांना जागा उपलब्ध होत नसल्याने भाड्यापोटी २१ कोटी रुपये शासनाला द्यावे लागले असून एवढ्या पैशात जागा घेऊन विद्यालय बांधणे शक्य होते, परंतु योग्य नियोजनाअभावी २१ कोटी रुपयांचा भार शासनाच्या तिजोरीवर पडत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात १६ आयटीआय प्रशिक्षण संस्था सुरु असून १४ आयटीआय शाळांना जागा मिळूनही २ शाळांना जागा मिळाल्या नाहीत व भाड्यापोटी कोट्यवधी रुपये शासनाचे खर्च झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

"औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अलिबाग व खालापूर" या संस्थांसाठी यापूर्वी प्रयत्न करुनही भूखंड उपलब्ध होवू शकला नसल्याने संस्था भाड्याच्या जागेत सुरु आहे. सद्यःस्थितीत दोन्ही संस्थेव्दारे भूसंपादनाकरीता कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साकरवाडी (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील गोदावरी बायोरिफायनरीज रसायन निर्मिती कारखान्यामधून होणारे प्रदूषण**

**(३२) * २६१९६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकरवाडी (ता.कोपरगाव,जि.अहमदनगर) येथील गोदावरी बायोरिफायनरीज (सोमय्या ऑरगॅनो केमिकल्स) या रसायन निर्मिती कारखान्यांस दूषित पाणी

शुध्दीकरण यंत्रणा तसेच त्याचे सर्व केमिकल प्लॅन्ट बंद करण्याचा आदेश राष्ट्रीय हरित लवाद न्यायालय (पुणे) यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी गत अनेक वर्षापासून वारी, साकरवाडी, कान्हेगाव, सडे इत्यादी परिसरात प्रदूषण करीत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. १७/०७/२०१३ रोजी आसवणी विभागाचे उत्पादन बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत. याबाबतीत वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांमार्फत तसेच मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी गठीत केलेल्या समितीमार्फत पाहाणी करण्यात आलेली असून सदर कारखान्यास दिनांक ११/२/२०१४ व ३/२/२०१५ रोजी जल (प्रदुषणाचे प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३/अ अंतर्गत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर उद्योगाची रुपये १९,००,०००/- इतकी बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे. मे.गोदावरी बाये रिफायनरी लि. यांचा आसवणी विभाग सद्यस्थितीत बंद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) शहराला होणारी पाणी टंचाई

**(३३) * २२९६९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) शहराला जालना जिल्हयातील पिरकल्यान व सावखेडभोई आणि शिराळा या तीन प्रकल्पातून पाणी पुरवठा होत असून २२ दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत असल्यामुळे पाणी टंचाई जाणवत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन प्रकल्पातील पाणी आटू लागल्यामुळे भविष्यातील तीव्र पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत वा येत आहेत,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य: स्थितीत देऊळगावराजा शहराला १६ दिवसांआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

शिराळा धरणावरुन देऊळगावराजा शहरास सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे. सद्य:स्थितीत शहरामध्ये नगरपरीषदेच्या ९३ विंधन विहीरी आहेत. तसेच, नागरीकांच्या खाजगी विंधन विहीरी आहेत.नागरीकांकडे १० ते १५ दिवस पुरेल इतकी पाणी साठवण करण्याची साधने आहेत.

(२) भविष्यातील तीव्र पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नगर परिषद देऊळगावराजा यांनी २५ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जेनेरिक औषधांवर एमआरपीचे बंधन नसल्यामुळे जादा दराने विक्री होत असल्याबाबत

**(३४) * १७२०६ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेनेरिक औषधांवर एमआरपीचे बंधन नसल्यामुळे आठ ते दहापट जादा दराने ही औषधे विकली जातात तसेच महागड्या ब्रँडेड औषधाइतकीच परिणामकारक आणि सुमारे ६० ते ७० टक्के स्वस्त असलेल्या जेनेरीक औषधांपासून औषध विक्रेत्यांना मिळणारे कमिशन कमी असल्याने औषध विक्रेते जेनेरीक औषधे आपल्या दुकानात ठेवत नसल्यामुळे जेनेरीक औषधांची विक्री केवळ १० ते २० टक्के होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने जेनेरीक औषधासंदर्भात (मेडिकल कौन्सील रेग्युलेशन २००२) नुसार डॉक्टरांनी औषधी जेनेरीक नावाने लिहिणे सक्तीचे केले असुनही रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये असलेला जागृतीचा अभाव मेडीकल व्यवसायिक तसेच डॉक्टरांना औषध कंपन्या आमिष दाखवत असल्यामुळे डॉक्टरही जेनेरीक औषधाचे प्रिस्क्रिप्शन देण्यास टाळाटाळ करत असल्याने लोकांना महागडी औषधे घ्यावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने जेनेरीक औषधावर एमआरपीचे बंधन घालणे तसेच ब्रॅडनेम ऐवजी घटकच डॉक्टरांनी लिहिण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ परिच्छेद १३ व २० नुसार प्रत्येक औषधासाठी एम.आर.पी. बंधनकारक आहे. तसेच परिच्छेद २६ नुसार औषधे एमआरपी पेक्षा जास्त दराने विकण्यास प्रतिबंध आहे.

औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ नुसार फक्त किरकोळ औषध विक्रेत्यांना १६ टक्के नफा मिळावा अशी तरतूद आहे. ठोक औषध विक्रेते व डॉक्टर्स यांना किती नफा मिळावा याबाबत कायद्यात तरतूद नाही.

(२) हे खरे नाही.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने "इंडियन मेडिकल कौन्सिल (प्रोफेशनल कॉन्डक्ट, एटीकेट अँण्ड एथिक्स) रेग्युलेशन्स, २००२" बनविले आहेत. या विनियमातील विनियम १.५ अनुसार प्रत्येक भिषकाने शक्यतोवर सामान्य (जेनेरिक) नावाने औषधपत्र (प्रिस्क्रीप्शन) द्यायला पाहिजे. परंतु तशी सक्ती नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबादमध्ये विना परवाना वॉटर प्यूरिफाय प्लँट असल्याबाबत

**(३५) * १६३८५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात १५० वॉटर प्यूरिफाय प्लँट असून यापैकी केवळ ९ प्लँट हे परवानाधारक आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वॉटर प्यूरिफाय प्लँट सुरु करण्याकरिता व त्या निर्मित उत्पादनांची विक्री करण्याकरिता ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (बीआयएस), अन्न व औषध प्रशासन यांची परवानगी घेणे गरजेचे असताना कमी गुंतवणुकीमध्ये प्लँट उभारण्यासाठी

औरंगाबाद जिल्हयातील वॉटर प्यूरिफाय प्लँट चालविणाऱ्यांनी सदर परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहूतेक ठिकाणी कूपनलिकेचे पाणी जारमधून, बाटलीबंद पाणी म्हणून अशुध्द पाणीच विकले जात आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन, कॉलरा, डी हायड्रेशन, पोटाचे विकार या रोगांची लागण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनधिकृत कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) अन्न सुरक्षा व मानदे कायदयांतर्गत बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणाऱ्या व्यावसायिकांना ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (बीआयएस), अन्न व औषध प्रशासन यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि, वॉटर प्युरीफाय प्लॅन्ट ही संज्ञा कायदयात नसल्यामुळे सदर व्यावसायिकास अन्न परवाना देण्याची कायदयात तरतूद नाही.

(३) अशा प्रकारची घटना निदर्शनास आलेली नाही.

(४) विना BIS परवाना व्यवसाय करणाऱ्या बाटलीबंद पाणी उत्पादकांविरुध्द अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील पाणी टाक्यांची झालेली दुरवस्था

**(३६) * २०८२० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात नळपाणी पुरवठा योजनेचे उद्भव कोरडे पडल्याने पाण्याअभावी २९४ योजना बंद असून सदर जिल्हयातील एकूण पाणी टाक्यांपैकी २३३ टाक्या गंजलेल्या किंवा कालबाह्य झाल्याने मोडकळीस आल्याचे दि २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाक्या पडण्याच्या भितीने नागरिक येथे पाणी भरण्यास जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त टाक्यापैंकी १६४ टाक्यांची दुरुस्ती करण्याबाबत तर ६९ टाक्या पाडण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशतः खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यात एकूण १५११ स्वतंत्र व ४४ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना आहेत. त्यापैकी २९४ योजना बंद आहेत. यामध्ये १५७ योजनांचे उद्भव कोरडे पडल्याने तात्पुरत्या स्वरुपात योजना बंद आहेत.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण १४३५ उंच टाक्या आहेत. यापैकी १२२६ टाक्या सुस्थितीत असून, उर्वरित २०९ टाक्यांपैकी १६० टाक्यांचे बळकटीकरण करणे आवश्यक असून टाक्यांचे बळकटीकरण करुन घेण्यासंबंधी ग्रामपंचायतीला सूचना देण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ४९ टाक्या कालबाह्य झाल्या असल्यामुळे त्यातील ५ धोकादायक टाक्या पाडण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ४४ टाक्यांचे अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना कळविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

सदरील टाक्या उर्ध्व जलकुंभ असल्याने नागरिक तेथे पाणी भरण्याकरीता जात नाहीत. तथापि सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे.

(३) या प्रकरणी चौकशी केली असता, शासन निर्णय दि. १७.१०.२०१४ नुसार अहमदनगर जिल्ह्यात डिसेंबर, २०१४ मध्ये जिल्हा परिषद गट निहाय नळ पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीचे सर्व्हेक्षण करण्यात आले. जिल्ह्यातील १४३५ उंच टाक्यांपैकी १२२६ टाक्या सुस्थितीत असून उर्वरित २०९ टाक्यांपैकी १६० टाक्यांचे बळकटीकरण करणे आवश्यक असून उर्वरित ४९ टाक्या कालबाह्य व जीर्ण झालेल्या आहेत. त्यापैकी ५ धोकादायक टाक्या पाडण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी पर्यायी टाक्या असून त्याद्वारे पाणी पुरवठा चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आसुडगाव (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिनीमधून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत**

**(३७) * २०१३३ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसुडगाव (ता.पनवेल, जि.रायगड) येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जलवाहिनी गत आठ महिन्यांपासून नादुरुस्त असून लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलवाहिनीची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दोन वेळा दुरुस्ती करूनही सदर जलवाहिनीतून पाणी गळती थांबलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गळती होऊन साचलेल्या पाण्यापासून परिसरात डासांची पैदासही वाढली असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दुरुस्तीकरिता दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित यंत्रणेतील अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही. सदर जलवाहिनीवर झालेल्या गळतीची तातडीने दुरुस्ती करुन घेतलेली असून पाणी गळती थांबलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) योजनेतील जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्याने वेळोवेळी होणाऱ्या गळत्या काढण्यात येतात. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) मधील मध्य भागात असलेल्या आदिवासी वाड्यांमधील लोकांना डबक्यांतील पाणी प्यावे लागत असल्याबाबत**

**(३८) * १९८३० श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) मधील मध्य भागात असलेल्या आदिवासी

वाड्यांमधील ग्रामस्थांना माहे मार्च, २०१५ च्या सुमारापासून डबक्यांतील पाणी प्यावे लागत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कर्जत पंचायत समितीकडे तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासी वाड्यांतील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याकरिता कोणती तातडीची उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) रायगड जिल्हयातील कर्जत तालुकयाच्या सन २०१४-१५ वर्षाच्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्याप्रमाणे ३९ गावे व ८० वाड्या अशा एकूण ११९ ठिकाणी उपाययोजना प्रस्तावित होत्या. त्यापैकी मागणीनुसार ११६ ठिकाणी उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

माथेरान परिसरातील नेरळ ग्रामपंचायतीमधील सर्व वाड्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा ग्रामपंचायत नेरळ मार्फत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आसल ग्रामपंचायतीमधील ९ वाड्यांना ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंबुसरे (ता. उरण, जि.रायगड) येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळेची दुरुस्ती करण्यासह नविन शेवा येथील शाळेस मंजूर अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * १९८३७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) कळंबुसरे येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा अत्यंत धोकादायक झाल्याने मोडकळीस आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त तालुक्यातील नविन शेवा येथील स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक शाळेला अनुदान मंजूर झाले असुन या शाळेला मंजूर झालेले अनुदान तातडीने वितरित करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या सुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग एक मधील सदरील शाळा पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती करण्यासह प्रश्न भाग दोन मधील शाळेस मंजूर झालेले अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर शाळा इमारत धोकादायक झाल्याने पाडण्यास, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत २ वर्गखोल्यांचे बांधकाम, शाळा इमारतीच्या मागील बाजूस केले आहे.

उरण तालुक्यातील नविन शेवा येथील स्वातंत्र्यवीर सावरकर माध्यमिक शाळेस, निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या
संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.